शैक्षणिक उपक्रम संशोधिका, ज्ञान प्रबोधिनी

॥ राष्ट्रदेवा: भवेम ॥

# ई-प्रशिक्षक

## प्रयोगशील प्रतिभासंपन्न शिक्षकांसाठीचे ई-मासिक

राष्ट्रीय सौर आषाढ शके १९४४
जुलै २०२२
वर्ष : ९ अंक : ६



# संपादकीय

सस्नेह नमस्कार,

ज्ञान प्रबोधिनीत अनेक समूहगीते म्हणली जातात. त्यातील एका पद्याचे ध्रुवपद आठवते.

तंत्रज्ञानी नवे सहस्रक केवळ वैभव सांगतसे
अध्यात्मासह विज्ञानाची हाक तुझी परि मनी वसे

मानवाच्या समूह-विकसनात तंत्रज्ञानाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आगीवर नियंत्रण, चाकाचा शोध, लोह-खनिजाचा वापर असे या प्रवासातील महत्त्वाचे ठळक टप्पे नोंदवता येतील. या सहस्रकातील गेल्या चार शतकांत विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या ज्ञानशाखा झपाट्याने विकसित झाल्या आहेत. मानवी समाजाच्या शैक्षणिक रचनांमध्ये तंत्रज्ञानाचे शिक्षण हा गाभाघटक बनला आहे.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर औद्योगिक विकासासाठी आवश्यक कुशल मनुष्यबळ निर्माण व्हावे म्हणून विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचे शिक्षण घ्यावे यासाठी प्रोत्साहन देण्यात आले. शालेय स्तरावर विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या अभ्यास शाखांचे तोंड ओळख व्हावी, आवड निर्माण व्हावी आणि उच्च शिक्षणात तंत्रज्ञानाच्या ज्ञान शाखांची निवड करण्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून कार्यानुभव, टेक्निकलसारखे विषय अभ्यासक्रमांत समाविष्ट करण्यात आले. आजच्या गरजा लक्षात घेऊन टिंकरिंग प्रयोगशाळा, मेकर्स स्पेस, इन्स्पायर पुरस्कार, इग्नाइट पुरस्कार असे नवीन उपक्रम शिक्षण क्षेत्रात राबवले जात आहेत.

गेल्य पंचाहत्तर वर्षांतील तंत्र शिक्षणाचा आढावा घेतला तर तंत्रज्ञानाच्या शिक्षणात तीन प्रमुख आयामांचा विचार करणे आवश्यक वाटते. कौशल्य विकसनासाठी हाताने काम करण्याची संधी देणारे कृतीप्रधान शिक्षण, नवनिर्मितीची क्षमता विकसित करण्यासाठी कल्पकतेला वाव देणाऱ्या शैक्षणिक रचना, फक्त नोकरी मागणारे कामगार तयार न होता संपत्ती निर्माण करण्याचा दृष्टिकोन विकसित होण्यासाठी उद्योजकता विकासाचे अनुभव या तीन मुद्द्यांचा विचार केला तर वरील काव्यपंक्तीतील विज्ञान-तंत्रज्ञानाच्या हाकेला आपण ओ

देऊ शकू.

आजच्या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या शैक्षणिक रचनांमधून निर्माण होणारे मनुष्यबळ पाहिल्यावर मानवी स्वभाव व वृत्तीबदलाची दोन प्रमुख आह्वाने जाणवतात. एक-विद्यार्थ्यांवर श्रमसंस्कार कसे करायचे आणि दुसरे, असे श्रम करून जे निर्मितीचे काम करतात त्यांच्याबद्दलचा कृतज्ञताभाव विद्यार्थ्यांच्या मनात कसा जागवायचा? हे दोन संस्कार करता आले तर तंत्रज्ञानाच्या सहस्रकात मानवातील मनुष्यत्व जोपासता येईल आणि देशात भौतिक संपत्तीच्या जोडीने सद्गुणसंपत्ती निर्माण करता येईल. त्यामुळे शिक्षण फक्त जेवणदायी न राहता जीवनदायी होईल.

विज्ञान-तंत्रज्ञानाच्या शिक्षणातून हे घडावे, यासाठी एक प्रार्थना-

वदनिकवळ घेता नाम घ्या मातृभूचे
सहज स्मरण होते आपुल्या बांधवांचे
कृषीवल कृषीकर्मी राबती दिवसरात्र
श्रमिक श्रम करोनी वस्तू या निर्मितात
स्मरण करुनी त्यांचे अन्न सेवा खुशाल
उदरभरण व्हावे चित्त होण्या विशाल

सस्नेह,
**प्रशांत दिवेकर**
संपादक, ई-प्रशिक्षक

***

## झारखंड दौरा, जून २०२२ छोटे सायंटिस्टस्

दिनांक २० जून २०२२ ते १ जुलै २०२२ दरम्यान पार पडलेल्या झारखंड दौऱ्यात ७ जणांच्या छोटे साइंटिस्टस् टीमने श्रीहरी वनवासी कल्याण केंद्रामार्फत चालविल्या जाणाऱ्या ग्रामीण भागातील सलगी, नवदीहा, सलडेगा आणि लचरागड विद्यालयांमध्ये कार्यशाळा घेतल्या. त्यादरम्यान प्रयोग आणि उपक्रमांमार्फत विद्यार्थ्यांपर्यंत विज्ञानाच्या ९ संकल्पना पोहोचविण्यात आल्या. एकूण ४ विद्यालय मिळून कार्यशालेदरम्यान ९२५ विद्यार्थी आणि शिक्षकांचा सहभाग होता.

# यंत्रज्ञ पूजन

शारदीय नवरात्र ... उत्सवी वातावरणात आदिशक्तीचे तसेच सामर्थ्याचे पूजन.. सामर्थ्य प्राप्त व्हावे, संकटावर मात व्हावी, सौख्य समाधान प्राप्त व्हावे हा या पूजनामागील हेतू. यातला खंडेनवमीचा दिवस... या दिवशी शस्त्रास्त्रांचे पूजन करण्याची आपली प्राचीन परंपरा आहे. अलीकडे बदलत्या काळानुसार लोक आपापल्या व्यवसायाप्रमाणे वस्तूंचे पूजन करत असतात. जसे की डॉक्टर स्टेथेस्कोप, शस्त्रक्रियेची उपकरणे, विद्यार्थी असेल तर पाटी-पुस्तक (आजकाल लॅपटॉप), शेतकरी असतील तर शेतीची अवजारे इत्यादींचे पूजन करतात. कारखान्यातील कामगार यंत्रांचे पूजन करतात.

आपण ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्रात गेली कितीतरी वर्षे खंडेनवमी साजरी करतो. दुर्गेची शक्ती आपल्यामध्ये यावी, तिचा आशीर्वाद मिळावा व ज्ञानप्राप्ती व्हावी म्हणून आपण हे पूजन करतो. आपला तंत्रशिक्षण विभाग गेली ३६ वर्षे कार्यरत आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना तारतंत्री, जोडारी, संधाता, विजाणू, अभियांत्रिकी, चित्रकला या विषयांचे प्रशिक्षण विद्यार्थी घेतात. पुढे संगणक, जैवतंत्रज्ञान, मुक्तिसोपान, अटल धडपडालय यांची स्थापना झाली. याद्वारे आपण मेक इन इंडिया व स्किल इंडिया या भारत सरकारच्या संकल्पना फुलवत आहोत. तांत्रिक कौशल्याच्या अभ्यासातून हाताला वळण लागणे, निर्मितीचा आनंद मिळवणे, प्रश्न सोडवण्याचा आत्मविश्वास मिळवणे या सर्व गोष्टी विद्यार्थी प्रबोधिनीत करत असतात. विद्यार्थ्यांना अनुभव-शिक्षण देणाऱ्या या विभागांमध्ये प्रतिवर्षी खंडेनवमी विभागवार साजरी होत होती व केवळ आपापल्या यंत्रांचे पूजन होत होते.

पण २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात मा. देवळेकर सरांनी कल्पना मांडली... ''यंदा खंडेनवमीला यंत्रज्ञांचे पूजन केले तर...'' ''देखणे ते हात ज्यांना निर्मितीचे डोहळे । मंगलाने गंधलेले सुंदराचे सोहळे ।।'' हे यंत्र चालवणाऱ्या हातांचे पूजन केले तर...? किती अभिनव कल्पना...! यंत्रांचे आपल्या जीवनात खूपच महत्त्वाचे स्थान आहेच. यंत्रं आपलं जीवन अधिक सुकर, सुलभ, सुरक्षित, वेगवान करतात. यंत्रं आधी कुणाच्या तरी मनात तयार

होतात... तो झाला मंत्रज्ञ. नंतर आराखडा–आरेखन होतं. पुढे प्रत्यक्ष यंत्र हातात आल्यावर तो यंत्रज्ञ ते यंत्र वापरू लागतो. नंतर त्यात अनेक बदल, सुधारणा घडतात व ही यंत्रे लीलया वापरासाठी सज्ज होतात. ही यंत्रं वापरणारे, हे तंत्र जाणणारे यंत्रज्ञ – तंत्रज्ञ यांचे पूजन करण्याची संकल्पना मा. देवळेकर सरांनी मांडली व खंडेनवमीच्या दिवशी प्रत्यक्ष उतरली. यंत्रांबरोबरच देशाच्या प्रगतीत हातभार लावणाऱ्या यंत्रज्ञांचे पूजन खंडेनवमीच्या दिवशी करण्यात आले.

उपासना करताना सर्वजण म्हणत होते .....

**हे परमात्मन,**
**आम्ही विद्यालयात तंत्रशिक्षण अथवा अभिरूची योजनांअंतर्गत**
**विविध कौशल्ये शिकण्याचा प्रयत्न**
**वेगवेगळ्या यंत्रांवर**
**ज्या ज्या कार्यशाळेत करितो,**
**तेथे आपले स्फुरण नित्य भरून राहिलेले असू दे.**

**या आमुच्या तंत्र मंदिरात**
**कौशल्य प्राप्तीची पूजा अखंड चालो,**
**ती ज्ञानपूर्वक भक्तियुक्त मनाने होवो**
**अशी आमुची प्रार्थना आहे.**
**प्रबोधिनीचे कार्य हे राष्ट्र उभारणीचे कार्य.**
**राष्ट्राच्या आर्थिक उभारणीत**
**मूलभूत काम करणारे कुशल हात येथून घडावेत.**

**हे परमेश्वर तुझ्या आशीर्वादाने हा संकल्प पूर्णतेस जावो.**

**भौतिक संपत्तीला**
**सद्गुणांच्या संपत्तीची जोड असल्याशिवाय**
**ती दैवी संपत्ती होत नाही.**
**सद्गुण विरहित संपत्ती**
**ही आसुरी संपत्ती होय.**

आम्ही दैवी संपत्ती येथे आणू इच्छितो.

जीवनदायी शिक्षणाबरोबरच जेवणदायी शिक्षण देणे,
हा प्रबोधिनीच्या कार्याचा गाभा आहे.
शिक्षण हे केवळ
पुस्तकातच आहे असे नाही.
जीवनासाठी आवश्यक प्रत्येक भौतिक सुविधा
निर्माण करणारे कुशल हातही महत्त्वाचे आहेत.
त्या हातांचे महत्त्व आणि त्यांची कौशल्ये आम्ही समजून घेऊ.

देशाच्या स्वातंत्र्य प्राप्तीनंतर
हा देश सुजलाम् सुफलाम् करण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले.
देशाच्या भौतिक विकासाचा आराखडा
आपले पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू
यांनी चांगला मांडला होता.
जमशेटजी टाटा, बिर्ला यांसारख्या उद्योजकांनी
भौतिक सुविधा निर्माण करता करता अनेक हातांना काम दिले.
सॅम पित्रोडा, राजीव गांधी यांनी देशात
तंत्रज्ञानाची क्रांती  घडवून आणली.
वर्गीस कुरियन, नारायण मूर्ती, गोदरेज, बजाज यांनी
जीवनोपयोगी वस्तूंच्या निर्मितीचे उद्योग देशभरात उभारून
देशबांधवांचे जीवन सुखी करण्यासाठी त्यांचे आयुष्य वेचले.

या सर्वांची परंपरा चालविणारे तंत्रज्ञ–यंत्रज्ञ–उद्योजक
येथून घडावेत, अशी आमुची इच्छा आहे.

हे परमात्मन् हे सर्व घडू दे ना !
तुझे मंगल आशीर्वाद सदैव आमच्या पाठीशी असूदेत.
कौशल्यसंपादन आणि उद्योजकाची स्वप्ने रुजविण्याचे हे कार्य
तुझ्याच इच्छेने सार्थकी लागू दे.

मनोमन अशी प्रार्थना करत असतानाच आधुनिक भारताचे चित्र सर्वांच्या डोळ्यासमोर तरळत होते. खरोखरच यंत्र ही मानवाला मिळालेली देणगी आहे. ही यंत्रे वापरणाऱ्या कुशल हातांचे देशाच्या प्रगतीत खूप मोठे योगदान आहे कारण नुसती यंत्रे असून उपयोग नाही तर ती कुशलतेने वापरता आली पाहिजेत तरच चांगले उत्पादन होऊ शकते. यंत्रज्ञांच्या हस्ते यंत्रपूजन झाल्यानंतर इलेक्ट्रिशियन, वायरमन, प्लंबर, फिटर, वेल्डर, मोटार मेकॅनिक, संगणक दुरुस्ती करणारे, साउंड सिस्टीम ऑपरेटर, वाद्य देखभाल-दुरुस्ती करणारे आदी कुशल यंत्रज्ञांचे औक्षण व सन्मान करण्यात आला. खरं तर एक प्रकारे दैनंदिन जीवनात आपल्याला रोज मदत करणाऱ्या हातांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. आपापल्या क्षेत्रात अभ्यास करून, कामाचा अनुभव घेत त्यांनी हे कौशल्य संपादन केले आहे, हे आपण विद्यार्थ्यांना दाखवले. आपल्या समाजात आधी बलुतेदारी पद्धत होती. आज ती जशीच्या तशी नसली तरी विविध क्षेत्रातील कामगार / तंत्रज्ञ / यंत्रज्ञ मिळूनच हा समाज चालवतात ही जाणीव आपण सदैव ठेवायला हवी व प्रत्येक क्षेत्रात करिअर करताना अभ्यास करणे आवश्यक आहे, हेही लक्षात ठेवायला हवे. कुठलेही काम हलक्या प्रतीचे नाही फक्त ते अभ्यासपूर्ण व जीव ओतून करायला हवे.

मनोगत व्यक्त करताना तंत्रज्ञ भारावून गेले होते, कारण आजवर ते यंत्र हाताळत पडद्यामागे असायचे, पण आज त्यांच्या कौशल्यपूर्ण हातांचा सन्मान होत होता. यंत्र कितीही कार्यक्षम असलं तरी ते हाताळायला मानवी हातच लागतो. खंडेनवमीला याच हातांचे आपण पूजन केले. असे हात घडवणारे, त्यांना मार्गदर्शन करणारे, नामांकित प्रशिक्षण केंद्राचे संस्थापक श्री. अमित गोरखे यांनी प्रमुख अभ्यागत म्हणून मार्गदर्शन करताना या उपक्रमाचे खूप कौतुक केले.

आपल्याला ऋषीमुनींच्या काळापासून तंत्रज्ञानाची परंपरा आहे. फक्त ते तंत्रज्ञान वापरायचं कसब आपल्याला जमलं पाहिजे. यातूनच कदाचित मोठे उद्योजक जन्म घेऊ शकतात. आपला अभिरूची प्रकल्प हाच विचार करून पुढे जात आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला कुठल्या विषयात आवड आहे, गती आहे, त्याची बुद्धिमत्ता कुठल्या क्षेत्रात आहे हे जितक्या लवकर शोधू तितकं अधिक पुढे जाता येईल पण त्या क्षेत्रात सातत्य राखणे आवश्यक आहे. उद्योजकाला सतत नाविन्याचा ध्यास असला पाहिजे. त्याने तंत्रज्ञान अवगत करत आपल्या

कल्पनाशक्तीला देखील उत्तेजन दिले पाहिजे. दुसऱ्यातील चांगले गुण हेरून ते आत्मसात केले पाहिजेत. कौशल्य - जिद्द - चिकाटी - प्रयत्न - कष्ट तर हवेतच. असं सगळं एकवटलं तर नक्कीच यशस्वी होता येतं.

आपलं ब्रीदवाक्य आहे 'रूप पालटू देशाचे' असे देशाचे रूप पालटवणारे, देश चालवणारे हात अत्यंत महत्त्वाचे आहेत. ते कौशल्याने परिपूर्ण असायला हवेतच. आज आपण जग जिंकायचा विचार करत आहात, पण त्यासाठी आधी स्वावलंबी व्हायला हवं. आणि त्यासाठी काम करायला हवं. विश्वकर्मा किंवा मग विश्वकर्म्यांची पूजा नित्य करायला हवी. विश्वकर्मा-देवांचा अभियंता, वास्तुविशारद, सृष्टीचा निर्माता.. त्याचेच हे सर्व बलुतेदार / तंत्रज्ञ / यंत्रज्ञ वंशज आहेत, कारण ते आपल्या हातांनी निर्मिती करतात. त्यांचा आपण सन्मान करायलाच हवा. हाच संस्कार खंडेनवमीच्या दिवशी विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याचा प्रयत्न केला.

***




**खंडेनवमी यंत्रपूजन लिंक**

https://youtu.be/D8JZvXaBPX8





# Automata - Mechanical Toys for the Classroom

**Background**

How can I make the use of toys as a medium to understand various concepts in our text books? This one question led me to my exciting journey in the world of automata toys, which started around a year back. Here is what I learnt so far.....

Toys are fun, and fun is important ! By definition, toys are for children but they can also be for adults. Automata, also known as mechanical toys, have universal appeal which transcends all ages. Fascination lies in a simple automated movement, whether the mechanism is hidden or revealed.

**Introduction**

Automata toys are 'story telling mechanical sculptures'. These are child-tailored communication devices, much appreciated by the children and easy to realize in the classroom. These whimsical and wonderful machines combine art, play, humor, science and engineering.

Automata toys are complete units that typically tell a short story someone chopping wood, a horse running, men fishing, etc. They utilize a combination of levers, cranks, linkages, cams, shafts, ratchets, gearing, and drives. Building automata toys is a good example of integrating science and art with an activity. For learners, the narrative and decorative aspects are as important as the mechanical elements. It is an involved process that has a lot of potential for stimulating the imagination of students and providing a fun, practical learning platform.

**Nature**

The Automata toy consists of two parts: its top features and an underlying mechanical assembly. In the mechanical part,

simple machine elements like cams, levers and linkages are used in a playful way. Features are brought to life with the help of paper figures, colors and other craft ideas.

**What do you learn?**

Keywords like creative thinking, verbal and non-verbal communication, adaptability, choice-making and more came to life in the automata workshops I conducted with teachers as well as students. Participants are guided to design and build their own automata using everyday material corrugated sheet, sticks and straws.

**Process and steps - How can you do this?**

Typical introductory session on this topic lasts for 2-3 hours in which participants work in teams.

✍ To begin with, the team discusses an event, process or abstract concept to work on. Lots of ideas are discussed and debated during this phase.

✍ Once an idea is finalized, the team comes up with a short story. Students choose stories based on animals, sports, hobbies or festivals while teachers try to choose concepts from the textbook. Story dictates how automata toy will come to life. Some parts of the story represent static parts while other parts are candidates for movement. Action verbs shortlisted from the story will drive the movement of automata toy.

✍ It is said that a picture is worth a thousand words. Drawing a picture of an automata toy and related mechanism is the most important step in the whole process. Team members can express their ideas in a better way through pictures.

✍ Some gaps are also identified at this juncture.

✍ Picture or schematic of the toy gives team members an opportunity to communicate how they feel about the construction process to be followed. In some instances, teams chose different action verbs as the selected one seemed too difficult to build.

✍ With a rough blueprint of the toy ready, the team gathers input

material like a box of corrugated sheet, wheels made from foam sheet, kebab sticks and thick paper.

✍ Members having inclination on the art side take up work like character drawing, cutting and painting. Others start connecting wheels, axles and the related motion part. Individual contribution in the area of one's choice can be seen in this phase. Any creative work involves challenges, difficulties and rewards.

✍ Building automata toy step offers these in abundance. Team normally goes through a couple of iterations before the automata toy comes to life. Many times it is only half done for want of time but joy of achieving part of the functionality is nonetheless visible.

| | |
|---|---|
| 1 | Explore, choose and decide the concept for the toy.<br>Pick up the topic out of that. |
| 2 | Write a paragraph about the topic. |
| 3 | Identify sentences with action verbs. Choose two of them. |
| 4 | Draw schematic about actions chosen. Sketch with label. |
| 5 | Build characters. |

In many instances, teams collaborate with other teams as well to learn from their creations as well as offer help in fixing things for others. Towards the end of the workshop, it's fulfilling to see your working automata toy placed next to the other toys. Participants enjoy the process more than the final automata toy itself. Many feel that making automata toy is not a very easy process which they initially thought but it is a satisfying and rewarding thing to do, especially when it finally works!

**Scope**


There is much more to learn and do in this field. Difficult to understand concepts in the textbook can be taken up as a theme for Automata toy. This automata toy can complement as a teaching aid in the classroom. Static models created by students as a part of a

project can be brought to life by adding motion in the same. Automata building activity allowed students to tinker with lots of things, guided by whim, imagination and curiosity. While tinkering, there are no instructions - but there are also no failures, no right or wrong ways of doing things. It's all about figuring out how things work and reworking them.

Note : Creations done by students and teachers are available at the following URL


https://tinyurl.com/automatatoys















# सपनविक्या-एक वेगळा अध्यापन अनुभव

मध्यमवयाचा दुनिया फिरून अनुभवाने समृद्ध झालेला रुबाबदार राजबिंडा माणूस नियमितपणे गावात येतो... चावडीवर लोकांना गावोगावचे अनुभव सांगतो जाता–जाता गाठोड्यातला सुकामेवा विकतो... त्यापेक्षा जास्त सुकामेवा निरपेक्षपणे जमावातील लहान मुलांना वाटून टाकतो... जमलेल्यांना दुःख विसरायला लावतो... लोकांना स्वप्न दाखवतो.. ती जगायची, पूर्ण करायची प्रेरणा देतो, लोकं त्याला 'सपनविक्या' म्हणू लागतात. लोकांना त्याच्या येण्याची सवय होते, लोक वाट पाहू लागतात आणि अचानक त्याचं येणं बंद होतं... खूप वर्षं येतच नाही.... अचानक यांच्यासारखाच रुबाबदार तरुण गावात येतो आणि त्याच्यासारखंच बोलू लागतो.... त्याचाच मुलगा.... मुलांना प्रेमाने सुकामेवा मोफत देणाऱ्या बापाने स्वतःचा मुलाच्या मनात निस्वार्थी 'वैद्यकीय सेवाव्रती' होण्याचं स्वप्न फुलवलेलं असतं.. आपल्या वडिलांचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी तो त्याचं चावडीवर येऊन बापाची स्वप्न विकण्याची परंपरा नेटाने पुढे न्यायचा प्रयत्न करु लागतो.... सपनविक्याची गोष्ट.... 'स्वप्न विकणारा माणूस'.. सातवीच्या बालभारती पुस्तकातील पाठाचे कथानक...

नवीन शैक्षणिक वर्षात नवी जबाबदारी म्हणून सातवीच्या वर्गाला बालभारती मराठीविषयी मार्गदर्शन करायची जबाबदारी आली आणि हल्लीहल्ली आवडीचा होऊ लागलेला विषय म्हणून मीही ती आवडीने स्वीकारली.

माझ्या अध्यापनाचा नैसर्गिक विषय 'कला' असल्यामुळे असेल कदाचित मी थोड्या वेगळ्या दृष्टिकोनातून पाठ्युस्तकांकडे पहायचा प्रयत्न करतो.

सातवीच्या वर्गात 'स्वप्न विकणारा माणूस' हा पाठ प्रकट पद्धतीने वाचता वाचता मन स्वाभाविकपणे भूतकाळात गेले आणि पाठात उल्लेखलेल्याप्रमाणे अनेक 'सपनविके' आठवले, आठवत गेले, आठवत राहिले.

मला आठवतंय साधारण १९९९– २००० च्या दरम्यान 'जेव्हा गवताला पाते फुटते/ आग्र्याहून सुटका' अशा कै. पणशीकर यांच्या कंपनीच्या

नाटकांचे ग्रामीण भागात प्रयोग लागले होते.. कंपनीची नाट्य मंडळींची गाडी आमच्या आरवलीच्या जवळपास ब्रेकडाऊन झाली आणि माझ्या मावशीच्या ओळखीचे श्री. रमेश भिडे त्या नाट्यकलाकारांच्या संचात होते.. मावशीच्या संपर्कातून श्री. रमेश भिडे आणि सहकलाकार यांची थोड्या वेळासाठी थांबण्यासाठी व्यवस्था आमचे घरी आम्ही केली होती. मी त्यावेळी महाविद्यालयात शिकत होतो पण नैसर्गिक कलेची आवड म्हणून चित्र काढत होतो. दत्त महाराजांवरची श्रद्धा म्हणून अगदी बाळबोध पद्धतीने (रंग, रंगमाध्यमे यापैकी कसलीही माहिती किंवा चित्रकलेचे शास्त्रोक्त शिक्षण नसल्यामुळे बाळबोध) मी काढलेले चित्र भिडेकाकांनी पाहिले आणि त्यांनी मला २० रुपयांची एक नोट आगाऊ रक्कम आणि बक्षीस म्हणून दिली आणि म्हणाले, ''मला स्वामींचे एक चित्र किंवा शिल्प तुझ्या सवडीने करून दे.. त्यासाठी चित्रकला शिक.. मेहनत कर..'' माझ्या आयुष्यात आलेला पहिला त्रयस्थ 'सपनविक्या' श्री. रमेश भिडे काका!! ज्यांनी दाखवलेल्या स्वप्नामुळे मी चित्रकला शिक्षणाकडे वळलो..... स्वामींचे चित्र आपल्याला जमायला हवे म्हणून!!

असाच आणखी एक सपनविक्या गृहस्थ श्री. सदानंद (नंदू) गद्रे माझ्या संपर्कात आले. आमच्या उत्सवातील नाट्यपरंपरामुळे... घरी होणाऱ्या तालमींच्या वेळी त्यांनी माझी चित्रं आणि मोडकीतोडकी अनुभवशून्य शिल्प



पाहिली आणि हक्काने मला म्हणाले, ''तू काय करतोयस इथे? चित्रकला महाविद्यालय गाठ.... मला 'कलाशिक्षणा'कडे वळवणारा स्वप्न विकणारा माणूस... मी मुद्दाम इथे 'चित्रकला शिक्षणाकडे' नाही म्हणते कारण चित्रशिल्प या सोबतच नाट्य या विषयाची स्वप्न माझ्यात रुजवली गद्रेसरांनीच!!

वरची दोन्ही स्वप्नं दाखवणाऱ्यांनी मला अलगद आणखी एका स्वप्न विकणाऱ्या माणसाच्या संपर्कात सहज आणून सोडलं!! प्रकाश अर्जुनराजे शिर्के म्हणजे सह्याद्री कलामहाविद्यालयाचे स्वप्न हट्टाने स्वतः पाहून रायगड, रत्नागिरी आणि सिंधदुर्ग या तिन्ही जिल्ह्यातील मुलांना ते स्वप्न दाखवणारा.. त्यांच्यात कलाकार होण्याची स्वप्नं निर्माण करणारा अवलिया 'सपनविक्या'... आमचे पप्पा सर!!

या तिघांनी दाखविलेल्या स्वप्नामुळे मी कलाक्षेत्रात शिकलो आणि कलाशिक्षक म्हणून शिक्षणक्षेत्रात आलो आणि पाच सात वर्षांपूर्वी आणखी असंख्य स्वप्नं दाखवणाऱ्या अनेक सपनविक्यांना घडवणाऱ्या दोन मोठ्या संस्था एकदम आल्या आयुष्यात 'शिक्षक प्रेरणा जागृती वर्ग' या प्रशिक्षणाच्या निमित्ताने! सांस्कृतिक क्षेत्रातील 'चतुरंग प्रतिष्ठान' आणि 'राष्ट्र घडणीसाठी मनुष्य निर्माण घडण' असा ध्यास घेतलेली ज्ञानप्रबोधनी!!

यांच्या संपर्कात आल्यानंतर नुसत्या एखाद्या तासाच्या संपर्काने आपल्या स्वप्न, ध्येय उद्दिष्टांना एका वेगळ्या टप्प्यावर वेगळ्या उंचीवर घेऊन जाणारे कै.श्री. विवेकराव पोंक्षे सर, श्री. विश्वासजी लापालकर, श्री. प्रवीण दवणे, श्री. अविनाश धर्माधिकारी, डॉ.श्री. प्रसाद देवधर, श्री.विद्याधर निमकर, श्री.प्रशांत दिवेकर असे स्वप्नांचा डोंगर उभा करणारे आणि हे डोंगराएवढं स्वप्न जगण्यासाठी सतत प्रत्यक्ष अप्रत्यक्ष प्रेरणा देणारे वरिष्ठ सपनविके भेटले आणि स्वप्नांनी गच्च भरलेलं गाठोडं अलगद सोपवून पुढच्या गावी स्वप्न विकण्यासाठी गेले पण जाताजाता एका अद्‌भूत आणि अफाट स्वप्नं दाखवणाऱ्या सपनविक्या मित्राला सोडून गेले आहेत. माझ्यासारख्या स्वप्नाळू माणसांची उमेद-उत्साह जागृत ठेवायला! तो सपनविक्या आहे आदित्य शिंदे!! स्वतःकडे, स्वतःच्या क्षमतांकडे, पेशाकडे, शिक्षण व्यवस्थेकडे पाहण्यासाठी नवा दृष्टिकोन नवा विचार देताना अनेक स्वप्नांची पेरणी करून नवी क्षितिजे दाखवतोय रोजच्या रोज.....

अर्थात प्राथमिकतेने पहिल्या क्रमांकावरील 'सपनविके' असतात आपल्याला या जगात आणणारे... आपल्याला ही चांगली वाईट दुनिया दाखवणारे आपले आईवडील!!! आणि बाबांसारखा 'स्वप्न विकणारा माणूस' नाही माझ्या आयुष्यात!! माझ्यातल्या चित्र, शिल्प, गायन, वादन, भजन सगळ्या स्वप्नांचं उगमस्थान आहेत बाबा... ज्यांच्यासारखं व्हावं.. ज्यांच्यासारखं जगावं असं एकच नितळ निर्मळ स्वप्न पहावं आणि जगावं असं स्वप्न कधीही बोलून न दाखवता दृश्यपणे दर्शविणारे बाबा... म्हणजे पण सपनविक्या!!

स्वप्नं दाखवणाऱ्या अशा माणसांची यादी करायची म्हटली तर वेळ अपुरा पडेल... शिक्षणाच्या प्रत्येक टप्प्यावरील शिक्षक, मित्र, शेजारी, प्रवासी अशा कितीतरी सपनविक्या व्यक्तींसोबत आयुष्यातले क्षण, प्रसंग, त्यांचे अनुभवाचे बोल आपली स्वप्नं समृद्ध करत असतात.

भिडे काकांनी दिलेली स्वप्न निर्माण करणारी २० रुपयाची नोट गेली २० वर्षे माझ्या खिशात जीवापाड जपली आहे मी...

सपनविक्याचा पाठ समजावून सांगताना न राहवून यातली काही उदाहरणं मुलांना सांगत असताना ती नोट खिशातून काढून दाखवली आणि त्या क्षणी मुलांच्या डोळ्यात अचानक निर्माण झालेली वेगळीच चमक माझ्या भावूक डोळ्यांना विलक्षण समाधान देऊन गेली.... एका 'सपनविक्याकडून' तीस चाळीस चमकणाऱ्या डोळ्यांच्या माध्यमातून 'स्वप्न विकणारा माणूस' त्या मुलांमध्ये.. त्यांच्या मनात हृदयांतरित केल्याचं विलक्षण समाधान... आनंद... आणि बरंच काही.... शब्दातीत!!

**– पराग गजानन लघाटे**

***


**शैक्षणिक उपक्रम संशोधिका,**
**ज्ञान प्रबोधिनी**

**पत्ता : 'विनायक भवन', ५१४, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.**
**दूरभाष : ०२०-२४२०७२३१ / २४२०७१९४**